PRESS MONITOR

Publication : Janprawas
Edition : Pune
Date : March 01, 2017

# रंगीबेरंगी हिंदवेअर स्नोक्रेस्ट एअर कूलर्स बाजारात दाखल

पुणे । प्रतिनिधी

हिंदवेअर या भारतातील सॅनिटरीवेअर बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रॅण्डचे प्रमोटर एचएसआयएल लिमिटेड तर्फे त्यांच्या एअर कुलर्समधील नव्या उत्पादनांचे अनावरण करण्यात आले. हिंदवेअर स्नोक्रेस्ट या ब्रॅण्डमधील या उत्पादनात एअर कुलर्समधील समोरच्या पॅनलचा रंग बदलता येतो. एअर कुलर्समधील या नव्या उत्पादनांमुळे एचएसआयएलच्या अष्टपैलू आणि व्यापक कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिव्हिजनला अधिक बळकटी मिळेल. भारतातील ३,६५० कोटींच्या एअर कुलर्सच्या बाजारपेठेत सध्या १० टक्क्यांची घसरण झाली असली तरीही आर्थिक वर्ष १४-१७ या काळात या बाजारपेठेने १६ टक्के सीएजीआर अनुभवला आहे. या बाजारपेठेत संघटित बाजारपेठेचा हिस्सा केवळ एक तृतीयांश आहे. त्यामुळे, एचएसआयएलला त्यांच्या एअर कुलर्समधील उत्पादनांचे अस्तित्व वाढवण्यास साह्य होणार आहे.

डेझर्ट, पर्सनल आणि विंडो या विभागातील हे एअर कुलर्स १८ लि. ते १०० लि. अशा एकूण १४ प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. रंग बदलता येणाऱ्या पॅनलची सुविधा काही निवडक मॉडेल्समध्ये उपलब्ध आहे. यात सध्या प्रिमिअम पर्पल, ब्रिक रेड आणि आयसी ग्रे हे रंग उपलब्ध आहेत.

३८०० एम/तास या वेगाने हवा बाहेर फेकणाऱ्या या मॉडेलमध्ये कमी ऊर्जा वापरून अद्वितीय थंडावा निर्माण केला जातो. ही ट्रेण्डी रंगीत उत्पादने ८९९० ते १७९९० रु. या किमतीत उपलब्ध आहेत.